आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शनिवार दिनांक 09/05/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 122 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# आज थलपती विजय घेणार मुख्यमंत्रीपदाची शपथ!


## मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**तामिळनाडु : थलपती विजय यांचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. बहुमतासाठी आवश्यक 118 आमदारांचा पाठिंबा मिळाल्यानंतर आता शनिवार, 09 मे 2026 रोजी सकाळी 11 वाजया टीव्हीके प्रमुख विजय तामिळनाडूच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहे. राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी विजय याला सत्ता स्थापनेचे निमंत्रण दिल्याची माहिती मिळाली आहे.**

शनिवारचा दिवस तामिळनाडूसाठी ऐतिहासिक दिवस असेल. शुक्रवारी रात्री राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांनी विजय याला सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित केले. लोकभवनात झालेल्या बैठकींनंतर शपथविधी सोहळ्याच्या घडामोडींना वेग आला आहे. तसेच सूत्रांच्या माहितीनुसार, काँग्रेस नेते राहुल गांधी या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहण्याची शक्यता आहे.निवडणूक निकालानंतर बहुमतासाठी लागणारा आकडा गाठताना ओढाताण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती.

मात्र, सीपीआय, सीपीआय(एम) आणि व्हीसीके या प्रमुख पक्षांनी जनमताचा आदर करत विजय यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. टीव्हीकेचे नेते कामराज यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले असून मित्रपक्षांच्या साथीने एक स्थिर सरकार तामिळनाडूमध्ये स्थापन होईल. टीव्हीके आणि काँग्रेसचे मिळून 113 आमदार होते. त्यात आता डाव्या पक्षाचे 4 आणि व्हीसीके पक्षाचे 2 आमदारांनी पाठिंबा देवू केला आहे. त्यामुळे हा आकडा आता 119 झाला आहे. जो की बहुमता पेक्षा एकने जास्त आहे.



# महापौर चषक सारख्या स्पर्धा युवा खेळाडूंना व्यासपीठ देण्यासाठी उपयुक्त

## मंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड शहर क्रीडा क्षेत्रात वेगाने पुढे जात असून महापौर चषकासारख्या स्पर्धांमुळे राज्यातील युवा खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळत आहे. अशा स्पर्धा केवळ खेळापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर शिस्त, नेतृत्व आणि संघभावना घडविण्याचे कार्य करतात, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तथा संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. आपला देश क्रीडा क्षेत्रात वेगाने प्रगती करत असून 2036 पर्यंत भारत नक्कीच ऑलिम्पिक स्पर्धेचे यजमानपद यशस्वीपणे भूषवेल, असेदेखील ते म्हणाले.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने भोसरी येथील गावजत्रा मैदान येथे आयोजित "महापौर चषक 2026-2027" राज्यस्तरीय स्पर्धेला मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी भेट देत शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांचा सत्कार केला तसेच खेळाडूंसोबत संवाद साधला,त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी आमदार महेश लांडगे, विधानपरिषद सदस्या आमदार उमा खापरे ,भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांच्यासह महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, महिला बालकल्याण समिती सभापती राणीमाई पठारे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्य शाम जगताप, मंदार देशपांडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, पंकज पाटील, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, आय.टी.सेलच्या संजिवनी पांडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, माजी नगरसदस्य विलास मडिगेरी, विकास डोळस, राजू दुर्गे, ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, 'भारत क्रीडा क्षेत्रात वेगाने प्रगती करत असून 2036 मध्ये भारतात ऑलिम्पिक स्पर्धा होणार आहेत. या दृष्टीने देशभरात क्रीडा स्पर्धांसाठी अत्याधुनिक क्रीडांगणे, प्रशिक्षण केंद्रे व आवश्यक सोयी-सुविधा उभारल्या जात आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या विविध उपक्रमांमुळे क्रीडेला चालना मिळत असून खेळाडूंना जागतिक दर्जाचे वातावरण व प्रशिक्षण उपलब्ध होत आहे. ही सर्व पावले 2036 ऑलिम्पिकच्या दृष्टीने महत्त्वाची तयारी मानली जात असून भारत त्या दिशेने सक्षम पायाभरणी करत आहे, असे देखील मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

यावेळी विविध क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यामध्ये बॉक्सिंग क्षेत्रातील विजय यादव, सायकलिंग क्षेत्रातील मीनाक्षी शिंदे, पॅरा जलतरणपटू वैष्णवी जगताप तसेच कबड्डीपटू विराज लांडगे यांचा गौरव करण्यात आला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 09/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महापालिकेच्या शाळांचा दहावीचा निकाल ९०.२४ टक्के

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांनी यंदाच्या दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून महापालिकेच्या 17 माध्यमिक मराठी शाळांचा एकूण निकाल 88.59 टक्के लागला आहे. तसेच उर्दू माध्यमाच्या 8 शाळांचा निकाल 97.87 टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी महापालिकेने राबविलेल्या विविध उपक्रमांना या निकालातून यश मिळाल्याचे दिसून आले आहे.**



महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे तसेच प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले आहे.

यंदा दहावीच्या परीक्षेसाठी महापालिकेच्या मराठी व उर्दू माध्यमाच्या 25 माध्यमिक शाळांमधून एकूण 2 हजार 925 विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी प्रत्यक्ष परीक्षेला 2 हजार 909 विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी 2 हजार 625 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून 16 विद्यार्थी गैरहजर राहिले. तर 284 विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. यंदाच्या निकालामध्ये 80 टक्क्यांहून अधिक गुण मिळविणारे 93 विद्यार्थी, 85 टक्क्यांहून अधिक गुण मिळविणारे 58 विद्यार्थी असून, 90 टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 17 इतकी आहे. तसेच 22 दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

महापालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक व दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी स्मार्ट क्लासरुम, डिजिटल शिक्षण पद्धती, अनुभवी शिक्षकवर्ग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विशेष अतिरिक्त तास, सराव परीक्षा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सर्व प्रयत्नांचे सकारात्मक फलित यंदाच्या निकालातून दिसून आले आहे.

विद्यार्थ्यांनी केलेल्या कठोर परिश्रमासोबतच शिक्षक, मुख्याध्यापक आणि पालकांच्या सहकार्यामुळे हे यश मिळाल्याची भावना शिक्षण विभागाने व्यक्त केली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे महापालिका प्रशासनाकडून अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार असून त्यांना पारितोषिक देण्यात येणार आहे. यामध्ये 90 टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांना प्रत्येकी 1 लाख रुपये, 85 ते 89.99 टक्के गुण प्राप्त विद्यार्थ्यांना प्रत्येकी 50 हजार रुपये, 80 ते 84.99 टक्के गुण प्राप्त विद्यार्थ्यांना प्रत्येकी 25 हजार रुपये तसेच दिव्यांग उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रत्येकी 50 हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे.

# पीसीसीओइ मध्ये 'के-नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक सेंटर ऑफ एक्सलन्स' ची स्थापना होणार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय मध्ये 'के-नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक सेंटर ऑफ एक्सलन्स' या सेलची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठीचा सामंजस्य करार पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय आणि के. नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक, पुणे यांच्या मध्ये करण्यात आला. पीसीसीओई संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी आणि कंपनीचे संस्थापक, संचालक प्रशांत अग्रवाल यांनी करारावर स्वाक्षरी केली. यावेळी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पंकज श्रीवास्तव, महाविद्यालयाचे स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. अजय गायकवाड, संशोधन व विकास विभागाचे अधिष्ठाता डॉ. नरेंद्र देवरे, डॉ. धीरजकुमार लाल, डॉ. विनय रंगारी आदी उपस्थित होते के नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक ही कंपनी अत्याधुनिक बांधकाम तंत्रज्ञान क्षेत्रात, विशेषतः थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जलद, मजबूत आणि किफायतशीर इमारती उभारण्यात अग्रेसर आहे. या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अल्पावधीत अचूक रचनात्मक बांधकाम करता येते, ज्यामुळे वेळ, खर्च आणि मनुष्यबळ यांची बचत होते. तसेच प्रीकास्ट आणि मॉड्युलर बांधकाम पद्धती, पर्यावरण पूरक आणि शाश्वत बांधकाम उपाययोजना, आधुनिक यंत्रणांचा वापर करुन बांधकाम क्षेत्रात नवोपक्रम घडवून आणण्याचे कार्य कंपनी करत आहे.



या कराराच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना थ्रीडी प्रिंटिंगसह अत्याधुनिक बांधकाम तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण, उद्योगाशी निगडित प्रकल्पांमध्ये सहभाग, संशोधनाच्या नव्या संधी तसेच रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

तसेच प्राध्यापकांना संशोधन आणि नवोपक्रमासाठी आधुनिक सुविधा मिळणार असून उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील दुवा अधिक मजबूत होणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड परिसरातील अभियांत्रिकी शिक्षणाला नवे बळ मिळणार असून विद्यार्थ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उज्वल भविष्याच्या संधी निर्माण होणार आहेत अशी माहिती पीसीसीओई संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी प्रसिद्धीस दिली आहे. डॉ. धीरजकुमार लाल आणि डॉ. विनय रंगारी यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी महाविद्यालयाचे संचालक आणि मार्गदर्शक, प्राध्यापक, समन्वयक यांचे हा सामंजस्य करार केल्याबद्दल अभिनंदन केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 09/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# "देऊळ बंद २" चा टीझर प्रदर्शित

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : श्रद्धा आणि अंधश्रद्धा, देव आणि नास्तिक यांच्यातील युद्धाने आजवर अनेक वळणे घेतली आहेत. मात्र, जेव्हा एक सामान्य स्त्री थेट देवालाच परीक्षेला बसवते, तेव्हा काय होते? याच उत्कंठावर्धक विषयावर आधारित 21 मे रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'वटवृक्ष एंटरटेनमेंट' निर्मित बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित "देऊळ बंद 2" चा टीझर आज श्री क्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रदर्शित करण्यात आला. अनेक स्वामी भक्तांच्या उपस्थितीत अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्याला निर्माते आणि चित्रपटाच्या संपूर्ण टीमसह राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक कार्य करणाऱ्या मान्यवरांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी दाखविण्यात आलेल्या टीझरने उपस्थित भक्तांच्या आणि रसिकांच्या मनात चित्रपटाची उत्सुकता अजूनच वाढली आणि सर्वांनी "देऊळ बंद 2" आम्ही चित्रपटगृहात जाऊन नक्की बघणार अशी ग्वाही दिली.**




"देऊळ बंद 2 - आता परीक्षा देवाची" च्या टीझरमध्ये आस्तिक शेतकऱ्याची नास्तिक पत्नी असणाऱ्या स्नेहल तरडे उद्विग्न अवस्थेत आपला नवरा देऊळ बंद करुन चावी घेऊन कुठेतरी निघून गेला असल्याची तक्रार घेऊन स्वामींना बोलाविण्यासाठी अत्यंत रागाने वारुळावर दगड मारते आणि स्वामी प्रकट होतात कारण भक्ताने मनापासून बोलावले की देव येतोच. त्यानंतर स्वामींचा विविध वाहनातून प्रवास दाखवताना काही दिग्गज कलाकारांची झलक पाहायला मिळते. पुढच्या प्रसंगात स्वामी म्हणतात "अगं ए नास्तिके प्रत्येक युगात तुझ्या सारखे कित्येक रावण आणि कित्येक दुर्योधन पाहिलेत मी देवाची परीक्षा पाहणारे" त्यावर शेतकरी महिला म्हणते "लिहून देते, कधी शेतकरी नसल पाहिला." त्यांच्या या संवादावरुन "देऊळ बंद 2" मध्ये आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी एक गरीब शेतकरी महिला देवाची सुद्धा परीक्षा घेऊ शकते हे स्पष्ट होत आहे. शेवटच्या प्रसंगात स्नेहल तरडे स्वामींना परत जायला सांगतात पण तू परीक्षेला बसवलं आहे ना? त्यामुळे परीक्षा दिल्या शिवाय मी जाणार नाही... आता परीक्षा देवाची असे म्हणत स्वामी जायला नकार देतात. नदीकाठचा निसर्गरम्य परिसर, भव्य वडाचे झाड आणि एका बाजूला स्वामींची जरब तर दुसऱ्या बाजूला एका सामान्य स्त्रीचे धैर्य, असा हा सामना खिळवून ठेवणारा आहे.

आता या परीक्षेत स्वामी कोणत्या प्रश्नांना समोरे जाणार आणि शेतकऱ्यांच्या कोणत्या समस्यांचे निवारण करणार? हे बघण्यासाठी प्रेक्षकांना 21 मे पर्यंत वाट बघावी लागणार आहे.

21 मे 2026 रोजी प्रदर्शित होणाऱ्या वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित "देऊळ बंद 2" चे लेखन आणि दिग्दर्शन प्रविण विठ्ठल तरडे यांनी केले असून निर्मिती कैलाश वाणी, जयश्री कैलाश वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी-सूर्यवंशी यांनी केली आहे.

चित्रपटात मोहन जोशी आणि स्नेहल तरडे प्रमुख भूमिकेत दिसणार असून महेश मांजरेकर, प्रसाद ओक, मंगेश देसाई, ओम भुतकर, संस्कृती बालगुडे, जगन्नाथ निवंगुणे, सुनील अभ्यंकर, अतुल कुडले आणि प्रविण तरडे महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत.

# थेरगावात युवकाचा खून!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**थेरगाव : मुलीच्या प्रेमप्रकरणाला आईचा विरोध असल्याने आईच्या प्रियकराने मुलीच्या 19 वर्षीय प्रियकराचा चाकू आणि चॉपरने वार करून खून केला. या हल्ल्यात आणखी एक तरुण गंभीर जखमी झाला. ही घटना थेरगाव येथे गुरुवारी रात्री अकराच्या सुमारास घडली. यामध्ये 19 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुभान शेख (वय 19) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. थेरगाव येथील शिवशंकर कॉलनी परिसरातील श्रीकृष्ण दूध डेअरी समोर गुरुवारी रात्री ही घटना घडली. सुभान शेख याच्यावर काही आरोपींनी धारदार शस्त्राने वार करत गंभीर जखमी केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या सुभानला नागरिकांनी तातडीने रुग्णालयात हलविले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.**




त्याचा मित्र जखमी झाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली असून त्यांना न्यायालयात हजर केले असता पाच दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. मृत तरुणाच्या वडिलाने काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे

काळेवाडी ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र बहिरट यांनी याबाबत माहिती दिली. मृत तरुण आणि एका तरुणीमध्ये प्रेमसंबंध होते. मात्र, या संबंधाला त्या तरुणीच्या आईचा तीव्र विरोध होता.

एक आरोपी हा तरुणीच्या आईचा प्रियकर आहे. त्याने तरुणाला या प्रेमसंबंधातून बाजूला होण्यास सांगितले होते. याच कारणावरुन त्यांच्यात वाद सुरु होता.

शुक्रवारी रात्री अकराच्या सुमारास थेरगावमध्ये आरोपींनी तरुणाला गाठले. त्यांच्यात पुन्हा वाद झाला आणि त्याचे रुपांतर हाणामारीत झाले.

रागाच्या भरात आरोपींनी जवळ असलेल्या चाकू आणि चॉपरने तरुणाच्या हातावर, पोटावर आणि मानेवर सपासप वार केले.

त्याला वाचवण्यासाठी आलेल्या मित्रावरही आरोपींनी हल्ला करुन त्याला गंभीर जखमी केले.

यात प्रियकर तरुणाचा मृत्यु झाला. काळेवाडी पोलीस तपास करीत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 09/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# सेवा रस्त्याचे निकृष्ट काम तत्काळ तोडा - खा. श्रीरंग बारणे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - महापालिका हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-बंगळुरु महामार्ग (देहूरोड-कात्रज) बाह्यवळण मार्गावरील मामुर्डी ते वाकड दरम्यान सेवा रस्त्याचे काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने केले जात आहे. किवळे येथे रस्त्यांचे काम अतिशय निकृष्ट झाले आहे. येत्या 15 दिवसांत सद्यस्थितीतील निकृष्ट काम पूर्णपणे काढून टाकून नव्याने दर्जेदार पद्धतीने काम पूर्ण करण्याचे निर्देश खासदार श्रीरंग बारणे यांनी एनएचआयच्या अधिकाऱ्यांना दिले.**




महापालिका हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-बंगळुरु महामार्ग (देहूरोड-कात्रज) बाह्यवळण मार्गावरील मामुर्डी ते वाकड येथील मुळा नदीवरील पुलापर्यंत दोन्ही बाजूस सेवा रस्त्यांचा विस्तार करण्यात येणार आहे. 12 मीटर अंतराने रस्त्याचा विस्तार करण्याचा आराखडा भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तयार केला आहे. त्यानुसार काम सुरु करण्यात आले आहे. या कामाची खासदार बारणे यांनी गुरुवारी पाहणी केली. यावेळी शिवसेना शहर प्रमुख तथा नगरसेवक निलेश तरस, नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस, युवासेना मावळ लोकसभा राजेंद्र तरस यांच्यासह महामार्ग विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, किवळे ते वाकड दरम्यान दोन्ही बाजूंनी बारा मीटर सेवा रस्ता विकसित केला जाणार आहे. किवळे येथे झालेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी आल्या होत्या. पाहणीदरम्यान अनेक ठिकाणी निष्कृष्ट दर्जाचे काम आढळून आल्याने संबंधित अधिकारी व ठेकेदारांना कामाच्या गुणवत्तेबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेशी आणि दैनंदिन वाहतुकीशी संबंधित कामांमध्ये कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. येत्या 15 दिवसांत सद्यस्थितीतील निकृष्ट काम पूर्णपणे काढून टाकून नव्याने दर्जेदार पद्धतीने काम पूर्ण करण्याचे सक्त निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या या कामामध्ये गुणवत्ता, टिकाऊपणा आणि नागरिकांच्या सुविधेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचनाही करण्यात आल्या.

या सेवा रस्त्याची पुढील पाच वर्षे देखभाल दुरुस्ती ठेकेदारच करणार आहे. काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करावे. कामामुळे वाहतूक कोंडी होत आहे. समीर लॉन्स परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. पावसाळा तोंडावर येऊनही काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे कामाला गती द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

# महापालिकेच्या देऊबाई कापसे उद्यानात बहुउद्देशीय विरंगुळा केंद्राचे भूमिपूजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड शहरातील उद्याने ही शहराचा श्वास आहेत. इतर शहरांच्या तुलनेत आपल्या शहरात अधिक उद्याने असून, त्यांचे संगोपन आणि संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. उद्यानांमध्ये उभारण्यात येणाऱ्या विरंगुळा केंद्राच्या माध्यमातून सर्व वयोगटातील नागरिकांना एकत्र येण्यासाठी, व्यायाम, सांस्कृतिक उपक्रम आणि सामाजिक संवादासाठी उत्तम व्यासपीठ उपलब्ध होणार आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोरवाडी येथील देऊबाई कापसे उद्यान परिसरात बहुउद्देशीय दोन मजली विरंगुळा केंद्राच्या कामाचे भूमिपूजन आज महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्य कुशाग्र कदम, तुषार हिंगे, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून शहरातील उद्यानांचे आधुनिकीकरण आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा देण्यावर विशेष भर दिला जात आहे. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळून त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कापसे उद्यानात उभारण्यात येणाऱ्या दोन मजली विरंगुळा केंद्रासाठी 6 लाख 53 हजार रुपये खर्च येणार असून या कामाची मुदत 8 महिन्यांची आहे.विरंगुळा केंद्र 18 मीटर बाय 8 मीटर असे एकूण 288 चौरस मीटर परिसरात असणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968